# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्र./ गो.वि./महा.वि १२०९४/२०१५
दिनांक ९ /१२/२०१५

स्मरणपत्र–२

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये

**विषय :– महाविद्यालयांतील प्राचार्य व प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत.**

संदर्भ :– १. शिक्षण संचालक(उ.शि), पूणे यांचे पत्र क्र. अमवि/२०१५/प्राचार्य रिक्त पदे/मवि–२–३ ,१२६७७, दिनांक ०३.१२.२०१५
२. या कार्यालयाचे पत्र क्र. गोंवि/महा.वि/२०१४/२०१५, दि. २०/११/२०१५

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, प्राचार्य व प्राध्यापकांची रिक्त पदे विद्यापीठाकडून वारंवार सूचना देऊनही व्यवस्थापन व महाविद्यालयांकडून भरल्या जात नाहीत. त्यामुळे शासन स्तरावरुन वारंवार विद्यापीठास विचारणा होत असून या बाबतीत तारांकीत प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त बाबींचा विचार करुन आपणांस विनंती करण्यात येते की, प्राचार्य व प्राध्यापक रिक्त पद भरतीबाबत तातडीने कार्यवाही करावी अन्यथा विद्यार्थ्यांचे नामांकन करता येणार नाही. आणि सदरहू जबाबदारी ही संबंधीत महाविद्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी आणि प्राचार्य व प्राध्यापक पदभरती तातडीने करावी, हि विनंती.

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक(प्रभारी)
महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्रे :– वरिलप्रमाणे

प्रतिलीपी :– १. मा. कुलगुरु महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता समादाराने अग्रेषित.
२. मा. परिक्षा नियंत्रक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
टक क्र. 1890 दिनांक 8/12/15
आवक क्र. 886 दिनांक 8/12/15

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक - अमवि/२०१५/प्राचार्य रिक्त पदे/मवि-२-३ , 12677 दिनांक- /१२/२०१५ 3 DEC 2015

प्रति,

१.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**विषय-प्राचार्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत**

संदर्भ-१. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक नियुक्ती-२०११/प्र.क्र.३४४/११/मशि-५ दि.१५/३/२०१२

२.संचालनालयाचे पत्र क्रामंक अमवि/२०१३/प्राचार्य पदे/मवि-२-३/३७९२ दिनांक १४/७/२०१३

३. संचालनालयाचे पत्र क्रमांक एनजीसी/परिपत्रक /मवि-२-३/४५८७, दि.२९/५/२०१५

४. संचालनालयाचे पत्र क्रमांक अमवि/२०१५/प्राचार्य रिक्त पदे/मवि-२,११७२४ दि.१६/११/२०१५

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय शासननिर्णय व पत्रान्वये अशासकीय अनुदानीत व कायम विना अनुदानीत महाविद्यालयामधील प्राचार्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत यापुर्वीच सूचना दिलेल्या आहेत.तरीही प्राचार्यांची पदे रिक्त असल्याचे दिसुन येत आहे.

या विषयाबाबत अधिवेशनामध्ये वांरवार तारांकित प्रश्न , कपात सूचना, लक्षवेधी सुचना ,अतारांकित प्रश्न उपस्थित होतात. तरी आपल्या विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानीत व कायम विना अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान ,विधी व अध्यापक महाविद्यालयामध्ये प्राचार्यांची पदे रिक्त असल्यास ती तात्काळ भरण्यात यावीत.

विभागीय सहसंचालक यांनी शासकीय ,अशासकीय अनुदानीत तसेच विद्यापीठांनी कायम विना अनुदानीत महाविद्यालयामधील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत संस्थाचालकास सूचना दयाव्यात. प्राचार्य पद नियमीत भरणे आवश्यक आहे याची सकारण जाणीव करुन दयावी.

दर महिन्याला प्राचार्यांच्या भरलेल्या व रिक्त पदांचा आढावा घेण्यात यावा व त्याची एक प्रत संचालनालयास सादर करावी.

(डॉ.व्ही.आर.मोरे)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीसाठी सविनय सादर

E:\imp data 15.6.2010\laq 2015.doc